मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत
विविध स्तरावरील मुल्यमापनासंदर्भातील
सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२,E- १२६६३३३/यो-११**
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ
फोर्ट, मुंबई ४०० ००१
**दिनांक : २७ मार्च, २०२६**

वाचा :

१. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२, E-११२३०५७/यो-११, दि.०६.०८.२०२५
२. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/प्र.क्र.१५२,१२६६३३३/यो-११, दि. ३१ डिसेंबर, २०२५
३. ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२, E-१५६५१३९/यो-११, दि.२७.०२.२०२६

**प्रस्तावना:**

ग्रामीण भागात स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून प्रामुख्याने काम करणाऱ्या ग्रामपंचायतीस, कामगिरीनुसार प्रोत्साहित करुन त्यांची कार्यक्षमता वाढविण्याकरिता, उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदांसाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षापासून राज्यात **"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान "** राबविण्यास संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सन २०२५-२६ या वर्षाकरिता सदर अभियानाचा कालावधी संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दि.३१.०३.२०२६ पर्यंत वाढविण्यात आला आहे. त्याअनुषंगाने अभियानांतर्गत सन २०२५-२६ करिता सर्व स्तरांवरील मुल्यमापन कालावधी व मुल्यमापनासंदर्भातील सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:**

सन २०२५-२६ करिता "मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज" अभियानांतर्गत सर्व स्तरांवरील मुल्यमापन कालावधी व मुल्यमापनासंदर्भात खालील सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी:-

## १. ग्रामपंचायतींनी स्वमुल्यांकन प्रस्ताव सादर करणे:-
## कालावधी : - दि.०१ एप्रिल, २०२६ ते दि.१५ एप्रिल,२०२६

अभियानात सहभागी सर्व ग्रामपंचायतींनी अभियानाच्या अधिकृत वेबसाईटवर लॉगिन करून आपला स्वमूल्यांकन प्रस्ताव निर्धारित कालावधीत सादर करणे बंधनकारक राहील. प्रस्ताव सबमिट केल्यानंतर त्यामध्ये कोणतीही **दुरुस्ती / अद्ययावत करता येणार नाही**. सदर प्रक्रियेदरम्यान काही अडचणी उद्भवल्यास राज्यस्तरीय तांत्रिक वॉर रूम किंवा संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याशी संपर्क साधावा.

१. सादर केलेली सर्व माहिती सत्य, अचूक व अद्ययावत असावी.

२. सर्व संबंधित कामांची छायाचित्रे Geotagged **स्वरूपात** अपलोड करावीत.

३. आवश्यक त्या सर्व नोंदी, अहवाल व कागदपत्रे पूर्णपणे अपलोड करावीत.

४. सादर केलेल्या आकडेवारी व छायाचित्रांमध्ये सुसंगती (consistency) असावी.

५. प्रस्ताव निश्चित कालावधीतच सादर करावा. विलंब झाल्यास प्रस्ताव ग्राह्य धरला जाणार नाही.

६. प्रस्ताव अंतिम सबमिट करण्यापूर्वी ग्रामपंचायतीने सर्व माहिती काळजीपूर्वक तपासावी.

७. स्वमूल्यांकन प्रस्ताव सादर करताना ग्रामसभेमध्ये त्याबाबत चर्चा करून **लोकसहभाग सुनिश्चित करावा.**

८. एकाच कामासाठी एकापेक्षा अधिक नोंदी अथवा चुकीची माहिती सादर होणार नाही याची दक्षता घ्यावी.

९. प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी लघु व्हिडिओ पुरावा (२ ते ३ मिनिटे) तयार करावा, जेणेकरून त्याचा वापर सादरीकरणासाठी होईल.

**अपूर्ण, चुकीची किंवा अप्रमाणित माहिती सादर केल्यास संबंधित ग्रामपंचायतीचा स्वमुल्यांकन प्रस्ताव मुल्यमापनासाठी अपात्र ठरविला जाऊ शकतो.**

**२. <u>तालुकास्तरीय मुल्यमापन</u> :-**
**कालावधी : - दि.१६ एप्रिल,२०२६ ते दि. ०५ मे,२०२६**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत तालुकास्तरीय मूल्यमापन पुढीलप्रमाणे करण्यात यावे:

१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय मुल्यमापन समिती स्थापन करण्यात यावी. सदर समितीत एक पत्रकार संघातील सदस्य व इतर ४ सदस्यांची नियुक्ती गट विकास अधिकारी करतील.

२. पारदर्शकता व निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी, **गटविकास अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील ग्रामपंचायतींचे मूल्यमापन न करता इतर महसुली विभागातील तालुक्यांतील ग्रामपंचायतींचे मूल्यमापन करावे**. यासंदर्भातील सूचना स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३. गट विकास अधिकारी व त्यांची टीम मूल्यमापनाची संपूर्ण जबाबदारी पार पाडतील. मूल्यमापन कालावधीत **सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी मुख्यालयी उपस्थित राहणे बंधनकारक राहील.** ज्या पंचायत समितीचा पदभार सहायक गट विकास अधिकारी यांच्याकडे आहे, त्या प्रकरणी संबंधित पंचायत समितीच्या **गट विकास अधिकाऱ्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून दिलेल्या तालुक्याच्या तपासणीची जबाबदारी त्यांनी स्वतः पार पाडावी.** आवश्यकतेनुसार,

त्यांनी आपल्या पदभाराची जबाबदारी योग्य अधिकाऱ्याकडे सुपूर्द करून मूल्यमापन कार्यास प्राधान्य द्यावे.

४. प्रत्येक गट विकास अधिकारी यांनी २० दिवसांच्या कालावधीत **दररोज किमान १ ग्रामपंचायत** याप्रमाणे आपल्या लॉग इन ला उपलब्ध करून दिलेल्या **एकूण १५ ते १९ ग्रामपंचायतींचे मूल्यमापन** करावे. तपासणीसाठी ग्रामपंचायतींची यादी संबंधित अधिकाऱ्यांच्या लॉगिन मध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. यासंबंधी सविस्तर सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

५. मूल्यमापनासाठी येणारा खर्च संबंधित गटविकास अधिकारी यांनी संदर्भ क्र.३ अन्वये आपल्या पंचायत समितीस प्राप्त अनुदानातून भागवावा. तसेच मुल्यमापनासाठी वाहतूक व्यवस्था देखील आपल्या पंचायत समितीकडून करावी.

६. मूल्यमापन समितीसाठी शासकीय विश्रामगृह आरक्षित करण्याची व्यवस्था स्थानिक पंचायत समितीने करावी.

७. मूल्यमापन समितीने ग्रामपंचायतीच्या स्वमुल्यांकन अहवालातील प्रत्येक घटकाच्या छाननीचे नियोजन करून ती विहीत कालावधीत पूर्ण करावी.

८. गट विकास अधिकारी यांना लॉगिनमध्ये उपलब्ध करून दिलेल्या ग्रामपंचायतींच्या यादीसाठी OTP Based Self Validation & Authentication प्रणालीच्या आधारे **परिशिष्ट “अ” प्रमाणे कार्यवाही करावी.**

**९. ग्रामपंचायतींकडून प्राप्त स्वमुल्यांकन प्रस्तावांचे मूल्यमापन करून सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची पुरस्कारासाठी निवड करावी. तालुकास्तरावरील प्रथम क्रमांकाची ग्रामपंचायत जिल्हास्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असेल.**

**१०.तालुकास्तरावरील विजेत्या ३ ग्रामपंचायती वगळता इतर ग्रामपंचायतींमधून संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट “अ” च्या प्रश्नावलीतील १. सुशासनयुक्त पंचायत २. उपजिविका विकास,सामाजिक न्याय, ३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव व ४. गावपातळी वरील संस्था सक्षमीकरण या घटकांमध्ये एकत्रितरित्या सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या २ ग्रामपंचायतींची विशेष पुरस्कारासाठी निवड करावी.**

११. सदर मूल्यमापन कालावधीत **गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करू नये. तपासणीत कसूर करणारे गट विकास अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र असतील.**

१२. मूल्यमापन अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी:-

- “पुरावा नसल्यास गुण नाहीत” हा नियम काटेकोरपणे लागू करावा.
- आवश्यक त्या प्रत्येक घटकासाठी geotagged छायाचित्रे अनिवार्य असतील. त्यासंदर्भातील तपासणी योग्य रित्या करावी.
- दररोज केलेले मूल्यमापन त्याच दिवशी पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे.

## ३. <u>जिल्हास्तरीय मुल्यमापन</u> :-
## कालावधी : - दि.०६ मे, २०२६ ते दि.२५ मे, २०२६

"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत जिल्हास्तरीय मूल्यमापन पुढीलप्रमाणे करण्यात यावे:

१. **मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय मूल्यमापन समिती स्थापन करण्यात यावी. सदर समितीत एक पत्रकार संघातील सदस्य व इतर ४ सदस्यांची नियुक्ती मुख्य कार्यकारी अधिकारी करतील.**

२. पारदर्शकता व निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींचे मूल्यमापन न करता **इतर महसुली विभागातील जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींचे मूल्यमापन** करावे. यासंदर्भातील सूचना स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३. प्रत्येक तालुक्यातील प्रथम क्रमांकाची ग्रामपंचायत जिल्हा स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असेल**. या ग्रामपंचायतींचे मूल्यमापन करून सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची जिल्हास्तरावरील पुरस्कारासाठी निवड केली जाईल. जिल्हास्तरावरील प्रथम क्रमांकाची ग्रामपंचायत विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असेल.**

४. मुल्यमापनासाठी येणारा खर्च संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी संदर्भ क्र.३ अन्वये आपल्या जिल्हा परिषदेस प्राप्त अनुदानातून भागवावा. तसेच मुल्यमापनासाठी वाहतूक व्यवस्था देखील आपल्या जिल्हापरिषदेकडून करावी.

५. मुल्यमापन समितीसाठी शासकीय विश्रामगृह आरक्षित करण्याची व्यवस्था ज्या जिल्हा परिषद क्षेत्रात मुल्यमापन करावयाचे आहे त्या जिल्हा परिषदेने करावी.

६. जिल्हास्तरीय मुल्यमापन समितीने, तालुकास्तरीय मूल्यमापन समितीमार्फत ग्रामपंचायतींच्या केलेल्या मुल्यमापन अहवालातील प्रत्येक घटकाची पुराव्यासह सखोल छाननी करावी. सदर मूल्यमापन प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने विहीत कालावधीत पूर्ण करावी.

७. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना लॉगिनमध्ये उपलब्ध करून दिलेल्या ग्रामपंचायतींच्या यादीनुसार OTP Based Self Validation & Authentication प्रणालीच्या आधारे **परिशिष्ट "अ" प्रमाणे कार्यवाही करावी.**

## ४. <u>विभागस्तरीय मुल्यमापन</u> :-
## कालावधी : - दि.२६ मे, २०२६ ते दि.१० जून, २०२६

"मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान" अंतर्गत विभागस्तरीय मुल्यमापन पुढीलप्रमाणे करण्यात यावे:

१. **विभागीय आयुक्त स्वतः किंवा त्यांच्या मान्यतेने अपर आयुक्त (विकास) यांच्या अध्यक्षतेखाली विभागस्तरीय मुल्यमापन समिती कार्य करेल. सदर समितीतील सदस्यांची नियुक्ती अध्यक्ष करतील.**

२. पारदर्शकता व निष्पक्षता सुनिश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्त किंवा अपर आयुक्त (विकास) यांनी **आपल्या विभागातील ग्रामपंचायतींचे मुल्यमापन न करता इतर महसुली विभागातील ग्रामपंचायतींचे मुल्यमापन करावे.** यासंदर्भातील सूचना स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येतील.

३. प्रत्येक जिल्ह्यातील प्रथम क्रमांकाची ग्रामपंचायत विभाग स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असेल. **या ग्रामपंचायतींचे मुल्यमापन करून सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची विभाग स्तरावरील पुरस्कारासाठी निवड केली जाईल. विभागस्तरावरील प्रथम क्रमांकाची ग्रामपंचायत राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असेल.**

४. मुल्यमापनासाठी येणारा खर्च ज्या जिल्हा परिषदेमध्ये तपासणीसाठी समिती जाणार आहे, त्या संबंधित जिल्हा परिषदेस संदर्भ क्र.३ अन्वये प्राप्त अनुदानातून भागवावा. मुल्यमापन समितीसाठी शासकीय विश्रामगृह आरक्षित करणे तसेच वाहतूक व्यवस्था व उपहाराचा इ.आवश्यक खर्च संबंधित जिल्हा परिषदेमार्फत करावा.

**५.** विभागस्तरीय मुल्यमापन समितीने, जिल्हास्तरीय मुल्यमापन समितीमार्फत ग्रामपंचायतींच्या केलेल्या मुल्यमापन अहवालातील प्रत्येक घटकाची पुराव्यासह सखोल छाननी करावी. सदर मूल्यमापन प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने विहीत कालावधीत पूर्ण करावी.

६. भेट देण्यात येणाऱ्या ग्रामपंचायतींची यादी संबंधित अधिकाऱ्यांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल. त्यानुसार OTP Based Self Validation & Authentication प्रणालीच्या आधारे **परिशिष्ट “अ” प्रमाणे कार्यवाही करावी.**

**५. <u>राज्यस्तरीय मुल्यमापन</u> :-**
**कालावधी : - दि.११ जून, २०२६ ते दि.३० जून, २०२६**

१. प्रत्येक विभागातील प्रथम क्रमांकाची ग्रामपंचायत राज्यस्तरावरील स्पर्धेसाठी पात्र असेल. **या ग्रामपंचायतींचे मुल्यमापन करून सर्वाधिक गुण प्राप्त ३ ग्रामपंचायतींची राज्य स्तरावरील पुरस्कारासाठी निवड केली जाईल.**

२. राज्यस्तरीय मुल्यमापन समितीसाठी मुल्यमापनाच्या ठिकाणी शासकीय विश्रामगृह आरक्षित करणे तसेच वाहतूक व्यवस्था व उपहाराचा खर्च संबंधित जिल्हा परिषदेने करावा.

३. राज्यस्तरीय मुल्यमापन समितीने, विभागस्तरीय मुल्यमापन समितीमार्फत ग्रामपंचायतींच्या केलेल्या मुल्यमापन अहवालातील प्रत्येक घटकाची पुराव्यासह सखोल व वस्तुनिष्ठ छाननी करावी. सदर मूल्यमापन प्रक्रिया नियोजनबद्ध पद्धतीने विहीत कालावधीत पूर्ण करावी.

**२. उपरोक्त सर्व मुल्यमापन समित्यांचे क्षेत्रीय स्तरावर कोणत्याही प्रकारचे स्वागत करण्यात येऊ नये. सर्व समित्यांनी मूल्यमापनास प्राधान्य देवून मूल्यमापनाचे कार्य यशस्वी करावे.**

३. **नाविन्यपूर्ण उपक्रम :-**

नाविन्यपूर्ण उपक्रम म्हणजे ग्रामपंचायतीने स्थानिक गरजा, उपलब्ध संसाधने व लोकसहभाग यांच्या आधारे मुख्य प्रश्नावलीत नमूद बाबींपेक्षा वेगळ्या, सर्जनशील, परिणामकारक व पुनरुत्पादित (replicable) पद्धतीने केलेली अशी कामे, ज्यामुळे गावाच्या विकासात ठोस व मोजता येण्याजोगा सकारात्मक बदल घडून येतो.

संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट "अ" नुसार नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी एकूण ५ गुण ठेवण्यात आले आहेत. प्रत्येक नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी १ याप्रमाणे एकूण ५ गुण देण्यात यावेत. प्रत्येक उपक्रमासाठी पुराव्यासह (छायाचित्रे, व्हिडिओ, कागदपत्रे) माहिती सादर करणे बंधनकारक राहील.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०३२७१०३४०५८८२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUBHASH BABAN INGALE

Digitally signed by SUBHASH BABAN INGALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=FF061387998F39CA303C7DA669FE0471CA884215AFEBE7E53EC C009E02AAD1CE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F0319D46C62F9F6D7DBC200D9693539DF215A28C05D55971515AC3C87DDAA987, cn=SUBHASH BABAN INGALE
Date: 2026.03.27 21:11:23 +05'30'

**(सुभाष इंगळे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री (नगरविकास) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उपमुख्यमंत्री (रा.उ.शु. व क्रीडा) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्य मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई,
८. सर्व मा.विधानपरिषद/विधानसभा सदस्य,
९. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
१०.अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
११.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांचे स्वीय सहायक, बांधकाम भवन, मुंबई,
१२.विभागीय आयुक्त, सर्व,
१३.जिल्हाधिकारी, सर्व,
१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व,
१५. निवडनस्ती यो-११.

ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्रमांक: मुसपंअ-२०२५/ प्र.क्र.१५२,E- १२६६३३३/यो-११,
दि.२७.०३.२०२६

**परिशिष्ट-अ**

**BDO/CEO/Division लॉगिन**

↓

प्रोफाइल अपडेट करा

(नाव, मोबाईल, ईमेल)

↓

पासवर्ड बदला

↓

Click on Tab "**ग्रामपंचायत पडताळणी**"

↓

नियुक्त ग्रामपंचायतींची यादी पहा

↓

प्रत्यक्ष भेट देऊन कागदपत्र पडताळणी

↓

मुख्य प्रश्नावली फॉर्म भरा

↓

अंतिम सबमिट (OTP Authentication - (BDO/CEO/Division व GP)

↓

**पडताळणी प्रक्रिया पूर्ण**